**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्राम पंचायती मार्फत व यंत्रणां मार्फत शेततळी व तत्सम कामे घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्रक्र. १२६ /रोहयो-१०-अ**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १४ डिसेंबर, २०११.**

**वाचा :शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक शेतत-२००९/प्र.क्र.२७१/रोहयो-५ दिनांक ०१/०१/२०१०**

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ नुसार अनूसचित जाती / अनुसूचित जमाती / अल्प भूधारक व सिमांत शेतकरी / इंदिरा आवास योजना व भुसूधार योजनेचे लाभार्थी यांच्या शेत जमिनीवर सिंचन सुविधा पुरविणे, भुसुधारणेची कामे हाती घेणे, फळबाग लागवड व वृक्ष लागवड इत्यादी वैयक्तीक लाभाची कामे घेण्याची तरतूद आहे. राज्य रोहयो अंतर्गत अनुदान पद्धतीने शेततळ्यांची कामे घेण्याबाबत मान्यता दिनांक १.१.२०१० च्या शासननिर्णयाद्वारे देण्यात आली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गतही शेततळ्यांची कामे केली जातात. राज्यात सर्व जिल्ह्यात एकाच पद्धतीने शेततळी व तत्सम अन्य कामे घेण्यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट - १ कलम १ (४) मधील तरतुदीनुसार खालील प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर ग्राम पंचायती मार्फत व यंत्रणांमार्फत शेततळी व तत्सम अन्य कामे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) अनुसुचित जाती
ब) अनुसुचित जमाती
क) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी
ड) भु-सुधार योजनेचे लाभार्थी
इ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी
फ) कृषि कर्ज माफी योजना २००८ नुसार अल्प भुधारक [ १ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर ) पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ)] व सिमांत शेतकरी [ १ हेक्टर पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ)]

## **१. लाभधारक निवड व अर्हता पध्दती :**

१.१ म.गां.रा.ग्रा.रोहयोसाठी जॉबकार्ड धारक वरील ‘ अ ’ ते ‘ फ ’ प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती वैयक्तीक लाभार्थी म्हणून या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.

१.२ इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. ही जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी. लाभार्थ्याने ७/१२ व ८-अ चे उतारे अर्जासोबत जोडावे.

१.३ इच्छुक लाभार्थ्याने ग्रामपंचायतीकडे अर्ज दाखल करावा.

१.४ म.गां.रा.ग्रा.रोहयोच्या कार्यपध्दतीप्रमाणे प्रत्येक काम घेण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची मान्यता आवश्यक आहे.

## **२. कार्यान्वयीन यंत्रणा**

शेतकऱ्या ंची कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी शेततळ्यांचा कार्यक्रम महत्वपूर्ण असल्यामुळे या कार्यक्रमाची अमंलबजावणी कृषी विभागा मार्फत किंवा ग्राम पंचायती मार्फत करण्यात यावी. त्यांचेद्वारे कामे करतांना तांत्रीक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या संदर्भात खालील प्रमाणे अधिकार असतील.

| कार्यान्वयीन यंत्रणा | तांत्रिक मान्यता | प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|
| ग्राम पंचायत | कृषी अधिकारी ( पंचायत समिती ) | गट विकास अधिकारी |
| कृषी विभाग ( यंत्रणा ) | तालुका कृषी अधिकारी | तहसिलदार |

यंत्रणे मार्फत काम करतांना दिनांक २७/०५/२०११ च्या शासन निर्णयाचे पालन करावे. तसेच ग्राम पंचायती मार्फत शेततळे घेण्याबाबत तालुका कृषी अधिकारी यांनी सर्वतोपरी मार्गदर्शन करावे.

## **३. खर्चाचे मापदंड निश्चित करण्यासाठी समिती :**

महाराष्ट्र हे मोठे राज्य असून, प्रत्येक भागाची स्थानिक / भौगोलिक स्थिती भिन्न आहे. राज्यात विविध विभागात विविध प्रकारचे भूस्तर आढळतात. तेव्हा संपूर्ण राज्यभरात शेततळे व तत्सम उपचार घेण्यासाठी एक ठराविक अंदाजपत्रक / आकारमान निश्चित करणे शक्य नाही. प्रत्येक जिल्ह्यातील भौगोलीक स्थिती व भूस्तराचा प्रकार लक्षात घेऊन जिल्ह्यातील शेततळे व अन्य तत्सम कामे यांचे आर्थीक व तांत्रिक मापदंड ठरविण्यासाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी --- अध्यक्ष

२) उपजिल्हाधिकारी, मग्रारोहयो --- सदस्य

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) जिल्हा परिषद --- सदस्य

४)कृषी विद्यापिठाचे कृषी अभियांत्रीकी विषयाचे प्राध्यपक किंवा शास्त्रज्ञ --- विशेष निमंत्रित

५) कृषी अधिकारी (मग्रारोहयो), मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. कार्यालय --- सदस्य सचिव

याव्यतीरीक्त या विषयातील जाणकार/तज्ञ व्यक्ती यांना समितीमध्ये विशेष निमंत्रित म्हणुन घेण्याची मुभा राहिल.

**आर्थिक व तांत्रिक मापदंड ठरवितांना विचारात घ्यावयाचे मुद्दे.**

अ) राज्य रोजगार हमी योजनेतुन अनुदान पध्दतीने शेततळी घेण्याबाबत, दिनांक ०१/०१/२०१० च्या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात आली आहे. यामध्ये शेततळयाचे आकार किमान १५ x १५ x ३ मीटर ते ३० x ३० x ३ मीटर या मर्यादेत ठेवण्यात आले आहेत. तथापी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लाभार्थी छोटे शेतकरी असल्याने १५ x १५ x ३ मीटर पेक्षा कमी आकाराची शेततळी घेण्यास अनुमती राहील. तसेच स्थानीक परीस्थितीचा विचार करून लांबी, रूंदी व खोलीबाबत आवश्यकते नुसार बदल करावा. सर्व साधारणतः छोट्या आकाराची शेततळी व तत्सम उपचार घेण्यास प्राधान्य द्यावे.

ब) शेततळयांबरोबरच अन्य तत्सम कामे जसे फड सिंचन, शेत खड्डे किंव जलकुंभ इत्यादी उपचार घेण्याबाबत तज्ञांच्या सल्ल्याने व मान्यतेनुसार समितीने निर्णय घ्यावा.

क) कोणत्याही परिस्थितीत जे.सी.बी. मशीन द्वारे तसेच ठेकेदांरामार्फत काम करणे अनुज्ञेय नाही. मजुरीचा खर्च कोणत्याही परीस्थीतीत किमान ६० टक्के पेक्षा कमी नसावा.

ड) स्थानीक परिस्थिती नुसार शेततळयांच्या तळाशी उच्च दर्जाचे प्लॉस्टिकचे आच्छादन वापरता येईल.

ई ) शेततळयाचा आकार शेतकऱ्यांच्या सहमतीने निश्चित करावा.

वरील मुद्दे व म.गां.रा.ग्रा.रोहयोतंर्गत मजुरीचा दर रू. १२७ विचारात घेऊन शेततळयाच्या आकारानुसार आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करावे. इनलेट व आऊटलेट सह शेततळयाचा आराखडा व संकल्प चित्र तयार करून त्याप्रमाणे खर्चाचे मापदंड समितीने ठरवावे व वितरीत करावे.

**४. मग्रारोहयो अंतर्गत शेततळे देताना खालील गोष्टी अनिवार्य आहेत.**

१) ग्राम पंचायत / ग्राम सभा यांचा लाभार्थ्यांच्या निवडीबाबतचा ठराव व शिफारस,
२) प्रत्येक शेततळे हे स्वतंत्र काम समजण्यात यावे.
३) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.
४) ज्या लाभार्थ्याला शेततळयाचा लाभ देण्यात येणार आहे तो जॉबकार्डधारक असला पाहिजे. तसेच त्याने मजूर म्हणून काम करुन मजूरी घेणे आवश्यक आहे.
५) मग्रारोहयोच्या मार्गदर्शक सूचनानुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत मजूरीचे प्रदान करणे, इत्यादी कार्यपध्दतीचा अवलंब झाला पाहिजे.
६) मग्रारोहयो अंतर्गत शेततळयाची कामे करतांना कुशल भागाचे काम करण्यासंदर्भात दिनांक १५.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे अकुशल व कुशल कामाचे ६०:४० हे प्रमाण कामाच्या वार्षिक एकत्रित प्रमाणानुसार ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. गिरीराज

**( व्ही. गिरीराज )**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रती,

मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२,
प्रधान सचिव ( कृषी ) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२,
सचिव, (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२, ( प्रसिध्दी करीता )
आयुक्त (कृषी ), महाराष्ट्र राज्य पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व कुलगूरू, कृषी विद्यापिठ,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे,
संचालक, भुजलसर्वेक्षण व विकास यंत्रणा पुणे,
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे,
विभागीय कृषी सहसंचालक, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातुर,
सर्व अधिक्षक कृषी अधिकारी,
उपसचिव, ( रोहयो समिती ) महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुबई,
सर्व उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी (मग्रारोहयो), नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२,
निवडनस्ती, कार्यासन रोहयो-१०-अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.